# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०५ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- मराठी भाषेला अभिजात दर्जा हा ज्ञान, आध्यात्म आणि साहित्याच्या समृद्ध परंपरेचा सन्मान असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन–ठाणे तसंच वाशिम इथं विविध विकास कामांचं लोकार्पण
- संविधान रक्षणासाठी आरक्षणाची मर्यादा काढण्याचं खासदार राहुल गांधी यांचं आश्वासन
- एनआयए तसंच एटीएसची छत्रपती संभाजीनगरासह जालन्यात कारवाई–तीन जण ताब्यात

आणि

- मोसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास सुरू

****

मराठी भाषेला अभिजात दर्जा हा ज्ञान, आध्यात्म आणि साहित्याच्या समृद्ध परंपरेचा सन्मान असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज ठाणे इथं, ठाणे आणि मुंबईतल्या विविध विकास प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आपल्या भाषणाची सुरुवात पंतप्रधानांनी मराठीतून केली. ते म्हणाले –

> ***आमच्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. ये उस परंपरा का सम्मान है, जिसने देश को ज्ञान, दर्शन, अध्यात्म, और साहित्य की समृध्द संस्कृती दी है। मै इसके लिये मराठी बोलने वाले सभी लोगों को बधाई देता हूं।***

पंतप्रधानांच्या हस्ते ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध नागरी विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली, यामध्ये मुंबई मेट्रोच्या आरे ते वांद्रे कुर्ला संकुल या भूमिगत मेट्रो टप्प्याचं उद्घाटन, ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि उन्नत पूर्व मुक्त मार्ग विस्तार प्रकल्पांची यावेळी पायाभरणी, ठाणे महानगरपालिकेच्या प्रस्तावित इमारतीचं भूमिपूजन, तसंच नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्राच्या विकासासाठी नैना प्रकल्पाची पायाभरणीचा समावेश आहे.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी इथं विविध विकास कामांचं उद्घाटन तसंच पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमाला केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय पशूसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राजीवरंजन सिंह, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.
यावेळी केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी, देशाचं आर्थिक पातळीवर नेतृत्व करण्याची महाराष्ट्रात असीम क्षमता असून, सर्वांनी एकत्र येऊन विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्रासाठी काम करण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले –

> ***साथीयों हमारे महाराष्ट्र मे देश के आर्थिक प्रगती का नेतृत्व करने की असीम क्षमता है। ये तभी होगा जब गांव, गरीब, किसान, मजदूर, दलित, वंचित सबको आगे बढाने का अभियान मजबुती से चलता रहेगा। मुझे विश्वास है, आप सब अपना आशीर्वाद बनाये रखेंगे। हम सब साथ मिलकर विकसित महाराष्ट्र, विकसित भारत के सपने को पुरा करेंगे।***

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं. कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प त्यांनी राष्ट्राला समर्पित केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थी महिलांना पंतप्रधानांच्या हस्ते धनादेश प्रदान करण्यात आले.

शेतीला दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी १९ मेगावॅट क्षमतेच्या ५ सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण पंतप्रधानांनी केलं. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अकोला, बुलडाणा आणि कोल्हापूर जिल्ह्यात हे सौर प्रकल्प आहेत. हे प्रकल्प उभारायला मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना २० कोटी ५५ लाख रुपये विकासनिधी पंतप्रधानांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पोहरादेवी इथल्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. या चार मजली संग्रहालयात बंजारा समाजाची माहिती देणारी १३ प्रदर्शनं आहेत. जगदंबा देवी आणि सेवालाल महाराजांचं दर्शन घेऊन, पंतप्रधानांनी बंजारा समाजातल्या मान्यवरांची भेट घेतली.

वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड यांनी संपूर्ण देशातील बंजारा समाजातील जातींना एका सूचित  समाविष्ट करणं तसंच बंजारा भाषेचा संविधानाच्या आठव्या सूचित समावेश करण्यात यावा अशी मागणी केली.

दरम्यान, या दौऱ्यासाठी पंतप्रधान आज सकाळी नांदेड मार्गे पोहरादेवीकडे रवाना झाले, यावेळी नांदेड विमानतळावर खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आदी मान्यवरांनी पंतप्रधानांचं स्वागत केलं. पोहरादेवी इथला कार्यक्रम आटोपून दुपारच्या सुमारास पंतप्रधान नांदेडमार्गे ठाण्याला रवाना झाले.

****

नाशिक– मुंबई ‘नमो भारत रॅपिड रेल्वे’ ही उपनगरी रेल्वे सेवा लवकरच सुरु होणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. भाजप पदाधिकाऱ्यांनी रेल्वमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत, या रेल्वे सेवेची मागणी केली होती.

****

नागपूर इथं उभारलेल्या दुमजली उड्डाणपुलाचं आज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत लोकार्पण झालं. हा पूल आशियातील चारस्तरीय वाहतूक असणारा पहिला दुमजली उड्डाणपूल ठरला असल्याचं प्रतिपादन गडकरी यांनी केलं.

****

संविधानाचं रक्षण करायचं असेल तर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा काढावी लागेल, असं मत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी व्यक्त केलं आहे. आज कोल्हापूर इथं संविधान सन्मान संमेलनात ते बोलत होते.

आरक्षणाची ही मर्यादा इंडिया आघाडी हटवेल आणि संसदेत जातनिहाय जनगणनाही मंजूर करण्यात येईल, असं आश्वासन गांधी यांनी दिलं.
खासदार शाहू महाराज, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा बावडा इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं राहुल गांधी यांच्याहस्ते अनावरण करण्यात आलं.
दरम्यान, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी लंडनमध्ये कथित वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी राहुल गांधी यांना पुण्याच्या विशेष न्यायालयानं समन्स बजावलं आहे. येत्या २३ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहून बाजू मांडण्याचे आदेश त्यांना न्यायालयानं दिले आहेत.

****

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा उद्या रविवारी छत्रपती संभाजीनगर इथं होणार आहे. शहरातल्या खडकेश्वर परिसरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदानावर दुपारी दीड वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

****

राष्ट्रीय तपास यंत्रणा एनआयए आणि दहशतवाद विरोधी पथक एटीएसनं आज पहाटेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर, जालना आणि मालेगाव इथं छापे टाकून चौघांना ताब्यात घेतलं. दहशतवादी संघटनांशी असलेले लागेबांधे आणि विघातक कृत्यातल्या सहभागाप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथं किराडपुरा भागातून एक आणि एन-6 परिसरातून एक अशा दोन जणांना तर जालना इथल्या चमडा बाजार भागातून एका तरुणाला ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे.

****

मोसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास आजपासून सुरू झाला. नंदुरबार जिल्ह्यातून आज मोसमी पाऊस परतल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. उर्वरीत महाराष्ट्रातूनही पुढच्या आठवड्यात मोसमी पाऊस पूर्णपणे परतून जाईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

मुंबईतील अधेरी विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार सिताराम दळवी यांचं आज दुपारी वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. मनसे नेते संदिप दळवी यांचे ते वडिल होत. अंधेरी विधानसभा मतदार संघातून १९९५ साली ते शिवसेनेचे आमदार म्हणून निवडून आले होते.

****

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आज बीड इथं दिवंगत विनायक मेटे यांच्या समाधीचं दर्शन घेतलं. विनायक मेटे यांचं मराठा आरक्षण चळवळीत खूप मोठे योगदान असून, त्यांच्या अकाली जाण्यानं समाजाची खूप मोठी हानी झाल्याची भावना आठवले यांनी व्यक्त केली. यावेळी शिवसंग्रामच्या प्रमुख ज्योती मेटे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

****

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथल्या ८०० लाभार्थी भाविकांचा पहिला जत्था उद्या रेल्वेने अयोध्येला रवाना होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दूरदृष्यप्रणालीद्वारे यात्रेकरुंना शुभेच्छा देणार आहेत. पालकमंत्री अब्दुल सत्तार हे रेल्वे स्थानकावर उपस्थित राहून हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

****